# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 04 / 10 / 2023 (बुधवार) सायंकाळ

---

## मोटर सायकल चोरी करणारे गुन्हेगार गजाआड

### —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिण ची कारवाई :—

नागपुर ग्रामिण जिल्हयात मोटरसायकल चोरींच्या घटना वाढत असल्याने त्यावर आळा घालण्या करीता मा. पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामिण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.) यांनी दिलेल्या सुचने वरून पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामिण यांनी त्याकरीता विशेष पथक स्थापन केले. दिनांक ०३/१०/२०२३ रोजी सदर पथकाने गोपनिय माहीतीच्या आधारे मोटर सायकल चोरीच्या गुन्ह्यांचे अनुषंगाने गुप्त बातमीदारां कडून तीन संशयित इसमा बद्दल महिती प्राप्त झाली. त्यानुसार पथकाने सापळा रचून तीन **संशयित इसम नामे— १) अमन बीसनदेव सहानी, वय २१ वर्ष, २) युनूस सिराज खान, वय २० वर्ष, ३) दीपक रामबच्चन गोसावी वय २४ वर्ष तिन्ही रा. खदान नं. ६ कन्हान** यांना ताब्यात घेतले. त्यांनी विचारपुस दरम्यान सदर मोटरसायकलींची चोरी ही मौजमस्ती करीता पैशांची आवश्यकता असल्याने चोरी केल्याचे सांगीतले. त्यांचे ताब्यातुन चोरी केलेली एक काळया रंगाची हिरो होंडा स्पेलडर मो. सा. क्र. MH 40 AJ 2207 किंमती अंदाजे ५०,०००/— रु चा मुद्देमाल जप्त करून पोलीस स्टेशन कन्हान येथील अप. क्र. ६३९/२३ कलम ३७९ भा.द.वि. मोटरसायकल चोरीचा गुन्हा उघडकीस आलेला आहे. नमूद आरोपीतांना वैद्यकिय तपासणी करुन जप्त मुद्देमाल व कागदपत्रांसह पोलीस ठाणे कन्हाण यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से) तसेच मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गून्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोलीस उपनिरीक्षक बट्टूलाल पांडे, सहायक फौजदार नाना राऊत, पोलीस हवालदार विनोद काळे, ईकबाल शेख, प्रमोद भोयर, पोलीस नायक संजय बडोदीया, चालक पोलीस हवालदार शुक्ला यांनी पार पाडली.

# चोरी

**पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील पंचशिल नगर रेल्वे गेट समोर सावनेर येथे दिनांक ०३/१०/२०२३ चे १४.१० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. शिला देवधर माडेकर, वय ५४ वर्ष रा. पंचशिल नगर रेल्वे गेट समोर सावनेर यांनी बैकेंतुन मजुरांना देण्याकरीता ६५०००/—रू आणलेले होते. त्यामधील ५००/—रू चे १००/—रू. नोटा १००/—रू च्या १००/—रू. नोटा, १००/— रू. नोटा ५/—रू च्या १००/— नोटा असे एकुण ६५०००/—रू काढुन प्लेझर मोपेड मोटरसायकल क्र. MH-40 AA-6257 गाडीच्या डिक्कीत ठेवुन घरी आली व घरी आल्यावर घरासमोर गाडी लावुन घराचे आत पतीला जेवन देण्याकरीता गेली असता बाहेरून बाजुच्या माणसाने येवुन सांगीतले की मोपेड गाडी कोणीतरी २ अज्ञात ईसम घेवुन जात आहे. यावरून फिर्यादीने आपल्या पतीला आवाज दिला असता फिर्यादीचे पती बाहेर आले व घराच्या थोडया अंतरावर गाडी उभी असुन तेथील डिक्की उघडी दिसली व डिक्की मध्ये पैसे मिळाले नाही तरी दोन अज्ञात ईसमांनी ते पैसे डिक्कीतुन चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विक्की लोखंडे, पोस्टे सावनेर, मो. नं. ७७२१८१४३०० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**